# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- ०२/१२/२०२२ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

२)

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०२.१२.२०२२ | पुण्यनगरी पु. पा. ०१ | जंजिरे धारावी किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पोलिसांची | मिरा-भाईंदर | |
| २. | ०२.१२.२०२२ | पुण्यनगरी पु. पा. ०१ | सेल्फी पॉइंट बनले पार्किंगचा अड्डा | मिरा-भाईंदर | |
| ३. | ०२.१२.२०२२ | लोकमत पा. नं. ०४ | बाप-लेकीच्या नात्यापेक्षा वासना ठरली वरचढ | भाईंदर | |
| ४. | ०२.१२.२०२२ | लोकमत पा. नं. ०४ | पुरावे सादर न केल्याने याचिकाकर्त्याला झापले | इतर | |
| ५. | ०२.१२.२०२२ | लोकमत पु. पा. नं. ०२ | जन संवाद कार्यक्रमात नागरिकांचा तक्रारींचा पाढा | मिरा-भाईंदर | |
| ६. | ०२.१२.२०२२ | लोकमत पा. नं. ०४ | १४ वर्षांच्या मुलीचे अपहरण | आचोळे | |
| ७. | ०२.१२.२०२२ | सामना पा. नं. ०७ | वीजचोरी पकडली | तुळींज | |
| ८. | ०२.१२.२०२२ | सामना पा. नं. ०७ | भाईंदर खाडीवरील नवीन पूल तीन महिन्यांत होणार खुला | मिरा-भाईंदर | |
| ९. | ०२.१२.२०२२ | लोकसत्ता पु. पा. नं. ०१ | नायगावमधील वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त | वसई-विरार | |
| १०. | ०२.१२.२०२२ | लोकसत्ता पु. पा. नं. ०१ | भाईंदर रेल्वे स्थानक मार्गावर दुतर्फा कोंडी | मिरा-भाईंदर | |
| ११. | ०२.१२.२०२२ | लोकसत्ता पु. पा. नं. ०१ | रात्रीच्या वेळी रिक्षाचालकांची अरेरावी | वसई-विरार | |
| १२. | ०२.१२.२०२२ | लोकसत्ता पु. पा. नं. ०१ | गुजरात राज्यातील निवडणुकीसाठी मुंबईतून मद्य | वसई-विरार | |
| १३. | ०२.१२.२०२२ | पुढारी पु. पा. नं. ०१ | कचऱ्याच्या गाडीची चोरी, आरोपी अटक | वसई-विरार | |
| १४. | ०२.१२.२०२२ | पुढारी पा. नं. ०४ | भाईंदर ते मोर्चा रस्ता १८ मीटरच प्रस्तावित करा | मिरा-भाईंदर | |
| १५. | ०२.१२.२०२२ | पुढारी पा. नं. ०२ | सरकारी कार्यालये "पेपरलेस" होणार | इतर | |
| १६. | ०२.१२.२०२२ | पुढारी पा. नं. ०३ | उद्यान बंद करुन रहिवाशांना मारहाण | काशिमीरा | |
| १७. | ०२.१२.२०२२ | सकाळ पु. पा.न. ०३ | आंदोलनाचा इशारा देताच रस्त्याचे काम | मिरा-भाईंदर | |
| १८. | ०२.१२.२०२२ | सकाळ पु.पा.न. ०१ | परिवहन सभापतीसाठी आज निवडणूक | वसई-विरार | |
| १९. | ०२.१२.२०२२ | सकाळ पु. पा. न. ०३ | चार रिक्षांचे टायर एकाच रात्रीत चोरी | माणिकपूर | |

CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २०. | ०२.१२.२०२२ | सकाळ पु. पा. न. ०३ | मिरा-भाईंदरमध्ये रंगणार कला महोत्सव | मिरा-भाईंदर | |
| २१. | ०२.१२.२०२२ | म. टा. पु.पा. ०१ | पोलिस भरती प्रक्रियेसाठी दोन मैदानांची निवड | मिरा-भाईंदर | |
| २२. | ०२.१२.२०२२ | म. टा. पा. ०३ | "राज्यपालांना आम्ही कसे रोखणार" | इतर | |
| २३. | ०२.१२.२०२२ | म. टा. पा. ०६ | बँक दरोडयातील आरोपीचा आत्महत्येचा प्रयत्न | विरार | |
| २४. | ०२.१२.२०२२ | म. टा. पा. ०१ | हेरॉइन जप्तः एकास अटक | वसई-विरार | |
| २५. | ०२.१२.२०२२ | म. टा. पा. ०१ | जाधव यांची नियुक्ती | मिरा-भाईंदर | |

CamScanner

पुण्य नगरी पु. पा. नं. १

# सेल्फी पॉइंट बनले पार्किंगचा अड्डा

। मीरा रोड : मीरा-भाईंदर शहरात अनेक ठिकाणी नगरसेवक निधीमधून सेल्फी पॉइंट बनवले आहेत. या सेल्फी पॉइंटसाठी महापालिकेतर्फे कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. बनवलेल्या सेल्फी पॉइंटचा वापर होत नाही. पेणकर पाडा येथे बनवलेला सेल्फी पॉइंट दुचाकींचा अड्डा बनला आहे. अशाच प्रकारे सेल्फी पॉइंटचा काहीही उपयोग होत नसल्याने नागरिकांच्या पैशाचा दुरुपयोग होत आहे.

मीरा-भाईंदर शहर सुंदर दिसण्यासाठी व नागरिकांना सेल्फी काढण्यासाठी प्रत्येक प्रभागात नगरसेवक निधीमधून सेल्फी पॉइंट बनवले आहेत. या सेल्फी पॉइंटसाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले आहेत. या सेल्फी पॉइंटचा नागरिकांना कोणत्याही प्रकारचा फायदा नसून यामध्ये पैशाचा अपव्यय होताना दिसत आहे. अनेक ठिकाणी बीयर बारच्या बाजूला सेल्फी पॉइंट बनवले आहेत. तर काही ठिकाणी फुटपाथवर बनवले आहेत. त्यामुळे नागरिकांना येण्याजाण्यास अडचण निर्माण होत आहे. सेल्फी पॉइंट बनवू नये, यासाठी अनेकांनी तक्रारी दिल्या, परंतु त्याचा महापालिका प्रशासन व नगरसेवकांवर काहीही परिणाम झाला नाही. कमिशन मिळेपर्यंत याकडे नगरसेवकांनी लक्ष दिले. परंतु कित्येक ठिकाणी सेल्फी पॉइंट धूळ खात पडले आहेत, असा नागरिकांनी आरोप केला आहे. हे सेल्फी पॉइंट नगरसेवकांच्या हट्टापायी बनवले खरे, परंतु याची देखरेख कोण करणार, देखरेखीसाठी येणारा खर्च कोण करणार याचे महापालिकेचे कोणतेही नियोजन नसल्याचे दिसून येते. देखरेखीच्या नावाखाली पुन्हा लाखो रुपये उधळले जाणार, अशीही चर्चा सुरू आहे.

पुढारी पु. पा. नं. १

# कचऱ्याच्या गाडीची चोरी, आरोपी अटकेत

मिरारोड : वसई-विरार महापालीकेचे कचरा संकलित करणारे ट्रक चोरी करून ते भंगारमध्ये विकणाऱ्या तीन आरोपींना परभणी येथून गुन्हे शाखा-२ वसई अटक करण्यात आली आहे.

त्यांच्याकडून ५ लाख ४० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वसई-विरार महापालीकेचे कचरा संकलित करणारे ट्रक चोरी जाण्याच्या घटनांच्या अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष-२ यांनी वेगवेगळी पथके तयार करून ट्रक चोरीचा तपास केला. या तपासामध्ये आरोपी बैजनाथ लांडगे , जहीर शेख , मुजीब शेख यांना परभणी येथून ताब्यात घेवून त्यांच्याकडे चौकशी केली असता आरोपी हे ४ ठिकाणी ट्रक चोरीच्या गुन्हयात सहभागी असल्याचे आढळून आले. या आरोपीनी चोरलेले ४ डंपर पैकी १ डंपर आणि ईतर डंपर तोडून त्याचे पार्ट वेगळे काढुन स्क्रॅपमध्ये विक्री केले होते. त्यांनी चोरलेल्या ३ डंपरचे इंजिन, क्लचपेट, गिअर बॉक्स आणि डिस्कसह टायर असा ५,४०,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी बैजनाथ लांडगे याच्या विरोधात नवी मुंबई आणि परभणी येथे चोरीचे ४ गुन्हे दाखल आहेत.

पुढारी पा. नं. ४

# भाईंदर ते मोर्वा रस्ता १८ मीटरच प्रस्तावित करा

## निधी पालिकेकडे वर्ग करण्याचे मुख्यमंत्र्यांचे एमएमआरडीएला आदेश

भाईंदर : राजू काळे

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील उत्तन, डोंगरी, पाली, चौक व तारोडी हि गावे विशेष पर्यटन क्षेत्रात समाविष्ट करण्यात आली असून या क्षेत्राचा विकास एमएमआरडीएच्या माध्यमातून केला जात आहे. यानुसार एमएमआरडीएने भाईंदर पश्चिमेकडील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानापासून ते उत्तन दरम्यान प्रस्तावित केलेल्या काँक्रीटचा रस्ता सरसकट ३० मीटर रुंद करण्याच्या कामाला एमएमआरडीएने काही महिन्यांपूर्वी सुरुवात केली. त्याला मुर्धा, राई व मोर्वा गावातील ग्रामस्थांनी विरोध करून रस्त्याचे बांधकाम बंद पाडून हा रस्ता १८ मीटरपर्यंतच रुंद करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. मात्र पालिकेने एक महिन्यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास आराखड्यात हा रस्ता ३० मीटर प्रस्तावित करण्यात आल्याने त्यावर ग्रामस्थांनी हरकती घेतल्या आहेत. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या रस्त्याचे बांधकाम तूर्तास १८ मीटर पर्यंतच करण्यात येऊन त्याचा निधी मजूर करून तो पालिकेकडे वर्ग करावा, असा आदेश एमएमआरडीएला दिल्याचे सुत्राकडून सांगण्यात आले.

यामुळे ग्रामस्थांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी एमएमआरडीएकडून मात्र कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे सांगण्यात येत आहे. या कार्यवाहीसाठी मुख्यमंत्र्यांनी एमएमआरडीएला एक महिन्याचा कालावधी दिला असतानाही निधी अभावी पालिकेने सुद्धा रस्त्याच्या बांधकामासाठी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. पण या रस्त्याच्या टप्पा क्रमांक दोन चे काम पालिकेकडून सुरु ठेवण्यात आले असून त्यासाठी देखील पालिकेला एमएमआरडीएकडून निधी वर्ग करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी एमएमआरडीएला दिल्याचे सांगण्यात येत आहे. राज्य शासनाने सुरुवातीला पालिका क्षेत्रातील मुर्धा ते चौक दरम्यानच्या ८ गावांमध्ये विशेष पर्यटन क्षेत्र लागू केले. त्याला या गावातील लोकांनी तीव्र विरोध दर्शविल्यानंतर शासनाने मुर्धा, राई व मोर्वा हि गावे वगळून उत्तन, डोंगरी, तारोडी, पाली, व चौक हि गावे जैसे थे ठेवली. येथील पर्यटन क्षेत्राच्या नियोजनासाठी शासनाने एमएमआरडीएची नियुक्ती केली आहे. त्याअनुषंगाने एमएमआरडीएने या क्षेत्राचा विकास आराखडा तयार करून तो २०१७ मध्ये लागू केला. त्यातील प्रस्तावित विकासाप्रमाणे एमएमआरडीएने भाईंदर पश्चिमेकडील बोस मैदान ते मोर्वा दरम्यान काँक्रीटचा रस्ता ३० मीटर प्रस्तावित करून त्यासाठी जमीन संपादनाची जबाबदारी पालिकेवर सोपविली. हा रस्ता १८ मीटर पर्यंतच बांधण्यात यावा, अशी मागणी केली. दरम्यान या गावांमधील सुमारे ३५ हेक्टर जमिनीवर एमएमआरडीएने मेट्रो कारशेड प्रस्तावित केली. रस्त्यासह कारशेडमध्ये गावातील बांधकामे व शेती मोठ्याप्रमाणात बाधित होत असल्याने ग्रामस्थांनी या दोन्ही विकासकामांना तीव्र विरोध करून त्यावर शेकडो हरकती दाखल केल्या. तर एमएमआरडीएने सुरु केलेल्या रस्त्याचे काम ग्रामस्थांनी बंद पाडले. अखेर मुख्यमंत्र्यांनी या गावातील पहिल्या टप्प्यातील प्रस्तावित ३० मीटर ऐवजी तूर्तास १८ मीटरचाच रस्ता बांधण्यात यावा. हा रस्ता एमएमआरडीएऐवजी पालिकेकडून बांधण्यात यावा. त्यासाठी एमएमआरडीने आर्थिक प्रस्ताव मंजूर करून त्याचा निधी पालिकेकडे १ महिन्यात वर्ग करावा, असे आदेश एमएमआरडीएला दिल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

CamScanner

पुढारी पा. न. २

# सरकारी कार्यालये 'पेपरलेस' होणार

## १ एप्रिलपासून 'ई-ऑफिस' प्रणाली; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**



प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान आणि 'पेपरलेस' होण्यासाठी येत्या १ एप्रिलपासून राज्यभरातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये 'ई-ऑफिस' प्रणाली सुरू करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी केली. केंद्राच्या धर्तीवर राज्यातदेखील शासकीय कामकाजाच्या फाईल्स निर्णयासाठी चार स्तरापर्यंतच पाठविण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. सर्व कार्यालये 'ई-ऑफिस' वापरू लागले की मोबाईलवरदेखील कामकाजाच्या फाईल्स, कागदपत्रे पाहता येतील, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

केंद्रीय प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार विभागाचे सचिव व्ही. श्रीनिवास यांनी एकनाथ शिंदे यांची 'वर्षा' निवासस्थानी भेट घेतली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी प्रशासकीय सुधारणांच्या क्षेत्रात विविध उपक्रम यशस्वीपणे राबविले जात असल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. राज्यात सुप्रशासनविषयक मार्गदर्शिका तयार करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याच्या सूचना देतानाच देशात सुप्रशासन निर्देशांकात द्वितीय क्रमांकावर असलेल्या महाराष्ट्राला प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचनाही शिंदे यांनी यावेळी दिल्या.

**सार्वजनिक तक्रारींवरील कार्यवाहीचा मुख्यमंत्री घेणार आढावा**

सर्वसामान्यांच्या शासनाकडून असलेल्या अपेक्षापूर्तीसाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या सार्वजनिक तक्रारींच्या निवारणासाठी ऑनलाईन यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. या तक्रारींचे डिजिटल ट्रॅकिंग करण्यात येईल. तक्रारींवर विभागांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यासाठी एक स्वतंत्र डॅशबोर्ड तयार करण्यात येणार आहे. या सार्वजनिक तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीचा स्वतः आढावा घेणार असल्याचे एकनाथ शिंदे यांनी यावेळी जाहीर केले.

**प्रत्येक विभागाची आणि जिल्ह्याची होणार 'गुड गव्हर्नन्स रँकिंग'**

सध्या महाराष्ट्रात फक्त राज्यस्तरावर सुशासन पद्धतीचे पर्यवेक्षण होते. आता शासनाच्या प्रत्येक विभागाचे आणि जिल्ह्याची गुड गव्हर्नन्स रँकिंग केली जाणार आहे. शासकीय विभाग आणि जिल्ह्यांच्या प्रशासनाद्वारे दिल्या जाणाऱ्या शासकीय सेवांची, सुशासनाची क्रमवारी निश्चित करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.



**फाईल्सचा प्रवास होणार कमी**

● सध्या मुख्यमंत्र्यांकडे निर्णयासाठी येणारी फाईल ८ विविध स्तरांमधून येते. या अधिकच्या स्तरांमुळे संबंधित विषयांच्या फाईल्सवर निर्णय होण्यास विलंब लागतो हे लक्षात घेऊन गतिमान कारभारासाठी फाईल्स सादर करण्याचे स्तर कमी करण्याच्या सूचना देतानाच फक्त चार स्तरांवरूनच ही फाईल मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्याचे निर्देश एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिले.

**ऑनलाईन सेवांची संख्या वाढणार**

● ई-सेवा निर्देशांकातदेखील महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आणण्यासाठी जास्तीत-जास्त सेवांची संख्या वाढविण्याच्या सूचना शिंदे यांनी दिल्या. सध्या राज्यातील ४५० सेवा ऑनलाईन दिल्या जात आहेत.

पुढारी पा. नं. ३

**संक्षिप्त**

## उद्यान बंद करून, रहिवाशांना मारहाण

**मिरा रोड :** मिरा रोड येथील म्हाडा कॉलनीत असलेले उद्यान एका विकासकाच्या बाउन्सरने बंद केले. त्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या स्थानिक रहिवाशांना बाउन्सरने केलेल्या मारहाणीत दोघे जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. बाउन्सरविरोधात काशिमिरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिरारोडच्या सृष्टी परिसरातील म्हाडा इमारतीमधील रहिवाशांसाठी उद्यान बनवलेले आहे. गेल्या काही वर्षांपासून या परिसरातील रहिवाशी, मुले या उद्यानात जातात. सोमवारी मुले खेळत असताना बाउन्सरने मुलांना उद्यानाबाहेर काढून उद्यान बंद केले. तेव्हा स्थानिक रहिवाशी हे उद्यान बंद का केले याचा जाब विचारण्यासाठी गेले. त्यावेळी रहिवासी व रवी ग्रुप या विकासकाचे बाउन्सर यांच्यामध्ये उद्यानाच्या वापरावरून वाद झाला. उद्यान बंद करण्यासाठी आलेल्या बाउन्सरना स्थानिकांनी विरोध केल्याने बाउन्सरने लोखंडी सळी फेकून मारली. यामध्ये एक १७ वर्षांचा मुलगा व एक नागरिक जखमी झाले. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर जखमी व्यक्तींनी काशिमिरा पोलिस ठाण्यात नितेश सुरजन, विशाल व झोया या तीन बाउन्सरविरोधात गुन्हा दाखल केला आहे. रहिवाशांसाठी असलेले उद्यान सुरू करण्यात यावे विकासकावरही गुन्हा दाखल करावा अशी रहिवाशांनी मागणी केली आहे.

सामना पा. नं. ८

## वीजचोरी पकडली

नालासोपारा : संतोष भवन येथील सीताराम हौसिंग सोसायटीत महावितरणच्या पथकाने टाकलेल्या धाडीत वीजचोरी उघडकीस आली आहे. मालती जयस्वाल व भुवन सिंग हे दोघेजण वीज चोरून वापरत असल्याचे या पथकाच्या निदर्शनास आले. त्यांनी आतापर्यंत सुमारे ९३ हजार रुपयांची सुमारे ४६११ युनिट्सची चोरी केल्याचे तपासात उघड झाले आहे.

CamScanner

पुण्य नगरी पुपा. नं. १

# जंजिरे धारावी किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पोलिसांची

## मानवी हक्क आयोगाच्या सुनावणीत पालिकेच्या विधी अधिकाऱ्याचे मत

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेच्या उत्तन येथे असलेल्या ऐतिहासिक जंजिरे धारावी किल्ल्यावर मद्यपान व अनैतिक प्रकार वाढले आहेत. याची राज्य मानवी हक्क आयोगाने स्वतःहून याचिका दाखल करून घेतली आहे. या याचिकेची सुनावणी बुधवारी पार पडली. किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पालिकेची नसून पोलिसांची आहे. असे पालिकेच्या विधी अधिकाऱ्याने मत मांडले.

मीरा-भाईंदर शहरात उत्तन येथे ऐतिहासिक जंजिरे धारावी किल्ला आहे. हा किल्ला अनेक वर्षांपासून पुरातत्त्व विभागाकडून दुर्लक्षित झाला आहे. त्यामुळे या किल्ल्याचे संवर्धन झाले नाही. किल्ल्यावर शहरातील अनेक शिवप्रेमी व दुर्गप्रेमीं संवर्धन मोहीम राबवत आहेत. त्यामुळे हा किल्ला पुन्हा नावारूपास येऊ लागला आहे. किल्ल्याचे संवर्धन करण्याची मागणी होऊ लागल्याने किल्ल्याच्या विकासासाठी राज्य शासनाने १० कोटी, तर मीरा-भाईंदर पालिकेने ३ कोटी रुपयांचा निधी किल्ल्याच्या विकासासाठी मंजूर केला आहे; परंतु हे काम काही तांत्रिक अडचणींमुळे रखडले आहे. किल्ल्याची देखरेख करणे गरजेचे असताना त्याकडे



प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे किल्ल्यावर अनेक तरुण मद्यसेवन आणि इतर अनैतिक प्रकार करत असल्याचे व्हिडीओ समाज माध्यमावर आल्याने हा प्रकार उघडकीस आला आहे. त्याची दखल घेत राज्य मानवी आयोगाने स्वतः पुढाकार घेत याचिका दाखल करून घेतली. या याचिकेची सुनावणी बुधवारी घेण्यात आली. या सुनावणीमध्ये मीरा-भाईंदर महापालिका, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय, अतिरिक्त मुख्य सचिव, नगरविकास विभाग आणि प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांना त्यांची बाजू मांडण्याचे आदेश देण्यात आले होते. यावेळी सुनावणीला महापालिकेच्या वतीने विधी अधिकारी सई वडके आणि ठाणे जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने अभियंता निखिल उपस्थित होते. दुर्गप्रेमी रोहित सुवर्ण यांनी अर्ज देऊन या सुनावणी प्रक्रियेत सहभाग घेतला. या सुनावणीवेळी पालिकेच्या विधी अधिकारी यांनी किल्ल्याची जागा आमच्या ताब्यात नसून ती पुरातत्त्व विभागाकडे आहे. त्यामुळे किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पालिकेची नसून पोलिसांची आहे. तसेच किल्ल्याविषयीची कागदपत्रे जमा करण्यासाठी वेळ मागून घेतला. यावर न्या. के. के. तातेड (निवृत्त) यांनी जंजिरे धारावी किल्ल्याचे संवर्धन होणे महत्त्वाचे आहे, असे सांगितले. यावेळी मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय आणि संचालक पुरातत्त्व आणि वस्तुसंग्रहालय महाराष्ट्र शासन यांनाही प्रतिवादी करण्याचे त्यांनी आदेश दिले.

म.टा.पु.पा. नं. १

# पोलिस भरती प्रक्रियेसाठी दोन मैदानांची निवड

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील दोन मैदानांची निवड पोलिस भरती प्रक्रिया राबवण्यासाठी करण्यात आली आहे. मिरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर प्रथमच शिपायांच्या ९९६ जागा प्रत्यक्ष भरती प्रक्रियेद्वारे भरल्या जाणार आहेत. त्यासाठी पोलिसांकडून ही तयारी केली जात आहे.



आयुक्तालयात स्थापनेपासूनच मनुष्यबळाची कमतरता आहे. काही रिक्त पदे ही मधल्या काळात पालघर, ठाणे, मुंबई व इतर जिल्ह्यांतून बदल्या करून भरण्यात आली आहेत. काही जागा अनुकंपा तत्त्वावर भरण्यात आल्या. मात्र, अद्याप एक हजाराहून अधिक पदे रिक्त आहेत. परिणामी आयुक्तालयाच्या हद्दीत मंजू झालेली नवीन पोलिस ठाणी सुरू करण्यात अडचणी येत होत्या. मात्र आता राज्य सरकारने भरतीला हिरवा कंदिल दाखवला आहे.

### शिपाई पदाच्या ९९६ जागा भरणार

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयातील ९९६ शिपाई पदांवर भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया राबवण्यासाठी मागच्या काही दिवसांपासून पोलिस आयुक्तालयाकडून मिरा-भाईंदरमध्ये मैदानांचा शोध सुरू होता. भाईंदर पश्चिमेचे नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान, मिरा रोड येथील दीपक रुग्णालय रस्त्यावरील सेव्हन इलेव्हन शाळेजवळील मैदान, स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे शाळेजवळील मैदान व जेसल पार्क खाडीलगतचे मैदान यांची पाहणी करण्यात आली होती.

त्यानंतर अखेर मैदानी चाचणीसाठी पुरुष उमेदवारांसाठी भाईंदर पश्चिमेचे नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान,- तर महिला उमेदवारांसाठी भाईंदर पूर्वेच्या जैसल पार्क चौपाटीलगतचे मैदान हे निश्चित करण्यात आले आहे. त्यासाठी मिरा-भाईंदर पालिकेकडून पोलिस आयुक्तालयाला परवानगी मिळाली आहे. येत्या काही दिवसांत मैदानाच्या परिसरात उमेदवारांसाठी शौचालय, पिण्याचे पाणी व इतर सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कामकाज केले जाणार आहे.

**दररोज ७०० उमेदवारांची चाचणी**

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर प्रथमच भरती प्रक्रिया राबवली जाणार असून अनेक वर्षांनंतर भरती प्रक्रिया पार पडणार आहे. त्यामुळे हजारो अर्ज येण्याची शक्यता आहे. त्यामुळे सुरुवातीचे काही दिवस दररोज सुमारे ७०० उमेदवारांची चाचणी घेण्याचा प्रयत्न असणार आहे. त्यानंतर हे प्रमाण वाढवले जाणार आहे.

CamScanner

सकाळ पु. पा. नं. ३

## चार रिक्षांचे टायर एकाच रात्रीत चोरी

नालासोपारा, ता. १ (बातमीदार) : वसईत एकाच रात्रीत मुख्य रस्त्यावर उभ्या केलेल्या चार रिक्षांचे टायर चोरी करून चोरटे फरारी झाल्याची घटना गुरुवारी उघड झाली आहे. याबाबत रिक्षाचालकांनी वसईच्या माणिकपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. विशेष म्हणजे मुख्य रस्त्यावर उभ्या रिक्षांचे टायर चोरी झाले आहेत.

वसई पश्चिम माणिकपूर परिसरातील स्टेला आणि मेरी व्हीला याठिकाणी वसई गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर पेट्रोल पंपासमोरील रिक्षा उभ्या करून रिक्षाचालक घरी गेले होते. गुरुवारी पहाटे रिक्षाचालक रिक्षा काढण्यासाठी आले असता त्यांच्या रिक्षाचे समोरील, पाठीमागील नवीन टायर चोरी झाल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकारे तब्बल चार रिक्षांचे टायर चोरी झाल्याने समोर आले.

म. टा. पा. नं. ३

## 'राज्यपालांना आम्ही कसे रोखणार?'

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

### जनहित याचिकेवर उच्च न्यायालयाचा प्रश्न



छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले अशा थोर व्यक्तींबाबत केलेल्या वक्तव्यांबाबत आक्षेप घेऊन जनहित याचिकेमार्फत राज्यपालांविरोधात महाभियोगाची प्रक्रिया सुरू करण्याची मागणी कशी काय केली जाऊ शकते, असे आश्चर्य मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी व्यक्त केले. त्याचवेळी भविष्यात विशिष्ट ऐतिहासिक थोर व्यक्तींबाबत बोलण्यास राज्यपालांना मज्जाव करावा, अशी विनंती याचिकेत कशी केली जाऊ शकते आणि त्यावर न्यायालय कसे काय निर्देश देऊ शकते? असे प्रश्नही मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता व न्या. अभय अहुजा यांच्या खंडपीठाने उपस्थित केले.

'महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे वारंवार वादग्रस्त विधाने करत आहेत. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत त्यांनी वारंवार वादग्रस्त विधाने केली असून, त्यांच्याकडून लोकभावनेचाही विचार होत नाही. त्यांच्या वक्तव्यांबद्दल लोकांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. राज्यघटनेच्या अनुच्छेद १९अन्वये असलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा ते दुरुपयोग



करत आहेत. त्यामुळे त्यांच्याविरोधात राज्यघटनेच्या अनुच्छेद ६१ अन्वये महाभियोग चालवण्याचे निर्देश राष्ट्रपती, केंद्र सरकार, राज्य विधिमंडळ व विधानसभा अध्यक्षांना द्यावेत', अशा विनंतीची फौजदारी जनहित याचिका दीपक जगदेव यांनी अॅड. नितीन सातपुते यांच्यामार्फत केली आहे. या याचिकेवर तातडीने सुनावणी घ्यावी, अशी विनंती सातपुते यांनी याचिकाकर्त्यातर्फे गुरुवारी खंडपीठाला केली. मात्र, अशा पद्धतीची जनहित याचिका कशी काय केली जाऊ शकते? राज्यपालांना वक्तव्ये करण्यास आम्ही कसे रोखू शकतो, असे प्रश्न खंडपीठाने उपस्थित केले. तसेच याचिकेतील मुद्दे तपासल्यानंतर ती सुनावणीसाठी केव्हा ठेवायची, याचा विचार आम्ही करू, असे स्पष्ट करत खंडपीठाने याचिकाकर्त्यांची विनंती फेटाळली.

म. टा. पा. नं. ६

## बँक दरोड्यातील आरोपीचा आत्महत्येचा प्रयत्न

म. टा. वृत्तसेवा, वसई

### गळ्यावर, मनगटावर पेपर पिनने केल्या जखमा

विरारमधील आयसीआयसीआय बँक दरोडा आणि हत्याकांडात दीड वर्षापासून अटकेत असलेल्या अनिल दुबे याने वसई गुन्हे शाखेच्या कार्यालयात आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. कागदाच्या पिनने गळ्यावर आणि मनगटावर वार करून त्याने स्वतःला जखमी करून घेतल्याने पोलिसांनी त्याला नजीकच्या खासगी रुग्णालयात उपाचारांसाठी दाखल केले.

विरारच्या आयसीआयसी बँकेचा माजी व्यवस्थापक अनिल दुबे याच्यामार्फत दीड वर्षापूर्वी दरोडा टाकण्यात आला होता. तसेच मध्ये आलेल्या महिला बँक व्यवस्थापकाची हत्याही करण्यात आली होती. या प्रकरणी दुबे दीड वर्षापासून अटकेत असून २५ नोव्हेंबरला त्याला सुनावणीसाठी वसई न्यायालयात आणले होते. मात्र त्यावेळी तो फरार झाला. विरारच्या गुन्हे शाखा ३च्या युनिटने त्याला आणि त्याचा साथीदार चांद याला ४८ तासांच्या आत पुन्हा अटक केली. वसईच्या गुन्हे शाखेत त्याला तपासासाठी बुधवारी आणले होते. दुपारच्या सुमारास अनिल दुबे कारागृहात असताना ब्लँकेट ओढून झोपला होता. त्यानंतर ब्लँकेट काढून पाहिले असता तो रक्ताच्या थारोळ्यात आढळला. त्याने कागदाच्या पिनने गळ्यावर आणि मनगटावर जखमा केल्या होत्या. त्याची प्रकृती ठीक असल्याचे पोलिसांनी सांगितले.

CS CamScanner

सामना पा.नं. ८

वर्सोवा जंक्शनची कोंडी फुटणार

# भाईंदर खाडीवरील नवीन पूल तीन महिन्यांत होणार खुला

## मार्च महिन्यापर्यंत काम पूर्ण करण्याच्या हालचाली

भाईंदर, दि. १ (सा. वा.) – मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील भाईंदर खाडीवर बांधण्यात आलेल्या नवीन वर्सोवा पुलाचे काम येत्या तीन महिन्यांत पूर्ण होणार असून लवकरच हा पूल वाहनचालकांसाठी खुला करण्यात येणार आहे. त्यामुळे घोडबंदर रोडकडून तसेच मुंबईहून येणाऱ्या वाहनांमुळे वर्सोवा जंक्शनला होणारी कोंडी फुटणार आहे.



मुंबई-अहमदाबाद महामार्ग व घोडबंदर मार्गावर वर्सोवा नाका हे मुख्य जंक्शन आहे. वर्सोवा खाडीवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून नवीन पुलाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. मात्र कोरोनाच्या काळात या कामाला ब्रेक लागला. त्यातच इतर तांत्रिक अडचणी, खाडी पुलावरील आव्हानात्मक कांम आदींमुळे या पुलाचे काम पूर्ण होण्यास विलंब लागला आहे. मात्र आता लवकरच पुलाचे काम पूर्ण होऊन येत्या वर्षात मार्च महिन्याच्या सुरुवातीला नवीन वर्सोवा पूल वाहनचालकांसाठी सुरू होणार असल्याची माहिती काशिमीरा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे यांनी दिली.

### चौकाचे काम हाती घेणार

नवीन पूल फाऊंटन हॉटेलसमोरील शेलकर पेट्रोल पंपापासून सुरू होणार आहे. ससूनवघरपर्यंत असा एकूण अडीच किलोमीटरचा मार्ग आहे. नवीन पूल सुरू झाल्यानंतर चौकाच्या कामासाठी जुना पूल बंद करण्यात येणार असून सर्व वाहतूक नवीन पुलावरून वळवण्यात येणार आहे.

लोकमत पु.पा.नं. २

# जन संवाद कार्यक्रमात नागरिकांचा तक्रारींचा पाढा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेस बुधवारी झालेल्या जन संवाद कार्यक्रमात नागरिकांनी आपल्या विविध समस्या मांडल्या. यावेळी पोलिस, महसूल, पालिका आदी अधिकाऱ्यांनी नागरिकांची तक्रार जाणून घेत काहींवर तोडगा काढला.

भाईंदर पश्चिमेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरभवन सभागृहात बुधवारी आमदार गीता जैन यांच्या प्रयत्नांनी जन संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी जैन यांच्यासह अपर तहसीलदार नंदकिशोर देशमुख, पालिका उपायुक्त मारुती गायकवाड, सहायक पोलिस आयुक्त शांतीलाल जाधव, वरिष्ठ पोलिस निरीक्षक मिलिंद देसाई, मुगुट पाटील, वाहतूक शाखेचे निरीक्षक रमेश भामे, माजी सभापती व भाजपा जिल्हाध्यक्ष ॲड. रवी व्यास, माजी नगरसेवक महेंद्रसिंह चौहान, ओमप्रकाश गाडोदिया, सुरेश खंडेलवाल, जयेश भोईर, प्रतिभा पाटील, गृहनिर्माण संस्थाचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

अभिहस्तांतरण प्रक्रिया होऊन सुद्धा जमीन मालकी गृहनिर्माण संस्थेचे नाव सातबारा नोंदी प्रलंबित असल्याच्या काही तक्रारी होत्या. त्यांवर महसूल विभागाने लवकर फेरफार करून नाव लावण्याचे आश्वस्त केले. वाहतूक व पार्किंग समस्या गंभीर बनली असून, पालिकेने पार्किंगचे धोरण अजून अंमलात आणले नाही. त्यामुळे पार्किंग समस्या आणि कारवाईबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. महापालिका कागदपत्रांची पडताळणी करत नाही वर कोणतीच सूचना न देता कारवाईसाठी येत असल्याचे एका नागरिकाने मांडले. विकास आराखड्याबाबत लोकांच्यां तक्रारी जास्त होत्या. जुन्या इमारतींचा पुनर्विकास, अभिहस्तांतरणची जुनी समस्या सोडवण्याची मागणी झाली. काही मोकळ्या जागा व्यसनींचे अड्डे बनल्याच्या मुद्द्यांकडे लक्ष वेधले.

लोकमत पा.नं. ४

# १४ वर्षांच्या मुलीचे अपहरण

**नालासोपारा :** नालासोपाऱ्यात एका १४ वर्षांच्या मुलीचे अपहरण करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. अलकापुरी येथे राहणारी अल्पवयीन मुलगी २६ नोव्हेंबरला सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घराजवळून बेपत्ता झाली होती. तिचे आरोपीने अपहरण केल्याचा संशय आल्याने मुलीच्या आईने बुधवारी आचोळे पोलिस ठाण्यात तक्रार देऊन अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. .याप्रकरणी अधिक तपास सुरु असल्याची माहिती पोलिसांनी दिली.


सकाळ पु.पा.नं. १

# परिवहन सभापतीसाठी आज निवडणूक

**विरार (बातमीदार) :** वसई-विरार महापालिकेच्या परिवहन समितीच्या सभापतींची गेल्या दोन वर्षांपासून रखडलेली निवडणूक शुक्रवारी (ता. २) होणार आहे. या निवडणुकीसाठी दोन अर्ज दाखल झाल्याची माहिती पालिकेचे सचिव राजेश घरत यांनी दिली. पालिकेच्या परिवहन समितीच्या सभापतींची निवडणूक गेल्या दोन वर्षांपासून रखडली होती. या समितीमध्ये १२ सदस्य होते. त्यातील सहा सदस्यांची मुदत संपल्याने ते निवृत्त झाले होते. सभापती पदासाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी भारत गुप्ता आणि कल्पक पाटील या दोघांनी उमेदवारी अर्ज पालिका सचिव राजेश घरत यांच्याकडे दाखल केले.

CS CamScanner

लोकसत्ता पु.पा. नं. १



# नायगावमधील वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त

## जूचंद्र रेल्वे फाटकावर सातत्याने कोंडी

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** नायगाव पूर्वेच्या जूचंद्र रेल्वे फाटक परिसरात सातत्याने होत असलेल्या वाहतूक कोंडीच्या समस्येमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. मंगळवारी सायंकाळी तुटलेल्या फाटकामुळे तासनतास नागरिकांचा खोळंबा झाला होता.

नायगाव पूर्वेकडील बाजूस जूचंद्र परिसर आहे, त्या भागातून बाफाणे ते नायगाव असा नायगाव स्थानक व महामार्गाला जोडणारा मुख्य रस्ता गेला आहे. या रस्त्याच्या मधूनच वसई ते दिवा लोहमार्ग गेलेला आहे, त्या लोहमार्गावरून मालवाहतूक गाड्या व प्रवासी वाहतूक गाड्या सुरू असतात. यासाठी जूचंद्र येथे रेल्वे फाटक बसविण्यात आले आहे. मात्र मालवाहतूक गाड्या व प्रवासी वाहतूक गाड्या यांची संख्या वाढली असल्याने फाटक हे वारंवार बंद करावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आता नायगाव पूर्व पश्चिमेला जोडणारा उड्डाणपूल ही वाहतुकीला खुला आहे. त्यामुळे या रस्त्यावरून वाहनांची वर्दळ अधिक वाढली आहे. याशिवाय जूचंद्र रेल्वे फाटक परिसरात उड्डाणपुलाच्या कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे रस्ता ही अरुंद झाला आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीत अधिक भर पडली आहे. रेल्वे मार्गातून एक गाडी जात नाही तोवर दुसरी गाडी येते. अशा वेळी फाटक बंद होत असल्याने नागरिकांचा खोळंबा होऊ लागला आहे. विशेषतः सकाळ-संध्याकाळ कामावरून ये-जा करण्याच्या वेळेत प्रवाशांचे अधिक हाल होत असतात.

मंगळवारी सायंकाळी सातच्या सुमारास रेल्वे फाटकाला वाहनाची धडक लागून फाटक तुटले होते. त्यामुळे अर्धा ते पाऊण तास फाटक उघडले गेले नसल्याने वाहनांची मोठी गर्दी होऊन वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

### बेशिस्त वाहनचालकांमुळे कोंडीत भर

रेल्वे फाटक उघडल्यानंतर अनेक वाहनचालक वाहने मध्येच घेऊन येत असल्याने समोरून ये-जा करणाऱ्या वाहनांना जाण्याचा मार्ग बंद होतो. स्वतः पुढे जाण्याच्या नादात आणखीन २० ते २५ वाहनांची कोंडी होत असते. या अशा प्रकारच्या बेशिस्त वाहनचालकांमुळे कोंडीत भर पडली आहे. अशा बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करून वाहतूक व्यवस्था सुरळीत करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

लोकसत्ता पु.पा. नं. १

# भाईंदर रेल्वे स्थानक मार्गावर दुतर्फा कोंडी

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** भाईंदर पश्चिम येथील एकमेव रेल्वे स्थानक मार्गावर दुतर्फा वाहने उभी केली जात असल्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या उद्भवू लागली आहे. त्यामुळे नागरिकांना या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून यामुळे मोठा वेळ वाया जात आहे.

गेल्या काही वर्षात भाईंदर पश्चिम परिसराचा विकास हा झपाट्याने झाला आहे.त्यामुळे या परिसरातून रेल्वेने प्रवास करणारे प्रवासी देखील वाढले आहे.परंतु भाईंदर पश्चिम येथे रेल्वे स्थानकावर जाणारा 'छत्रपती शिवाजी मार्ग' हा एकमेव मार्ग असल्याने तो आता वाहतुकीस अरुंद पडू लागला आहे. त्यात रस्त्याच्या दोन्ही बाजूला बेकायदा वाहने उभी करण्यात येत असल्याने रिक्षा आणि परिवहन बस गाडयांना मार्ग काढणे कठीण होऊ लागले आहे. या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांचावाहतूक कोंडीत रोज वेळ वाया जात आहे.




काही महिन्यापूर्वीच येथील वाहतूक कोंडीची समस्या मार्गी लावण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून चार वाहतूक कर्मचारी तैनात करण्यात आले आहे. परंतु तरी देखील रस्त्याच्या कडेला उभी राहणारी वाहने कमी न झाल्यामुळे ही समस्या कायम असल्याची तक्रारी प्रवासी वर्गाकडून करण्यात येत आहे.

CamScanner

लोकमत पा. नं. ४

# पुरावे सादर न केल्याने याचिकाकर्त्याला झापले

## तत्कालीन पोलिस अधीक्षकांना दिलासा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** राज्य पोलिस तक्रार प्राधिकरणाचे न्यायमूर्ती श्रीहरी डावरे यांच्या अध्यक्षतेखालील डिव्हिजन बेंच कोर्टाने आपल्या अंतिम निकालाद्वारे तत्कालीन पालघर जिल्हा पोलिस अधीक्षक गौरव सिंग व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक हितेंद्र विचारे यांना दिलासा दिला आहे. दुसरीकडे याचिकाकर्ते निमेश वसा हे मुद्दे पटवून देण्यात तसेच आवश्यक पुरावे सादर करण्यात अपयशी ठरल्याने त्यांना न्यायालयाने चांगलेच फटकारले.



प्राधिकरणाकडे २०१८ मध्ये दोघा अधिकाऱ्यांविरोधात दाखल असलेली तक्रार याचिका निकाली निघाली आहे. न्यायमूर्ती डावरे यांनी बुधवारी एका महत्त्वपूर्ण निकालाद्वारे आगरी सेनेचे कायदेशीर सल्लागार व माहिती अधिकार कार्यकर्ते वसा यांची तक्रार याचिका फेटाळली आहे. तब्बल ३४ पानी निकालपत्रात न्यायमूर्तींनी तक्रारदार वसा यांच्याबाबत अनेक गंभीर निरीक्षणे नोंदविली आहेत. वसा हे माहिती अधिकाराचा दुरुपयोग करीत असल्याची माहिती वसई-विरार शहर महापालिकेकडून 'पालघर पोलिसांना मिळाली. त्यामुळे वसा यांच्यावर खंडणीचे गुन्हे दाखल करण्याचे आदेश गौरव सिंग यांनी दिले होते. हे आदेश चुकीचे असून, पालघर पोलिसांपुढील संभाव्य कारवाईपासून संरक्षण मिळण्यासाठी तसेच आगरी सेनेच्या काही कार्यकर्त्यांना पालघर पोलिस दलातील स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी खंडणीच्या खोट्या गुन्ह्यात अडकविण्यासाठी प्रयत्नशील असून, त्यात अनिकेत वाडिवकर संगनमताने पालघर पोलिसांना मदत करीत असल्याचा आरोप करण्यात आला होता.

> माहिती अधिकार कार्यकर्ते निमेश वसा यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. त्याचा पाठपुरावा आम्ही सुरूच ठेवणार आहोत. पोलिस दलाविरोधात खोटे आरोप करणाऱ्यांना निदान आतातरी या निकालामुळे जरब बसेल.
>
> – गौरव सिंग, तत्कालीन पोलिस अधीक्षक, पालघर

लोकमत पा. नं. ४

# बाप-लेकीच्या नात्यापेक्षा वासना ठरली वरचढ

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** स्वतःच्या दोन अल्पवयीन मुलींवर सातत्याने लैंगिक अत्याचार करणाऱ्या वासनांध ५० वर्षीय बापास भाईंदर पोलिसांनी अटक केली आहे. भाईंदर पोलिस ठाणे हद्दीत राहणारा हा आरोपी रिक्षा चालवतो. त्याच्या पीडित १८ वर्षीय मुलीच्या फिर्यादीवरून गुरुवारी सायंकाळी भाईंदर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पीडित मुलगी ७ वर्षांची असल्यापासून बाप तिच्याशी अश्लील चाळे करायचा, तिच्यावर शारीरिक अत्याचार करायचा. तिने विरोध केला की तिला शिवीगाळ, मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देत असे. तसाच लैंगिक छळ तो दुसऱ्या लहान १४ वर्षांच्या मुलीसोबत करत असे. आई मानसिक आजारी, तर अन्य बहिणी-भाऊ लहान असल्याने सांगायचे तरी कोणाला, असा प्रश्न पीडित मुलींना पडायचा. २९ नोव्हेंबरलाही पुन्हा त्याने मुलीचा विनयभंग केला. अखेर बापाचा अत्याचार असह्य झाल्याने पीडित मुलीने भाईंदर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

म. टा. पु. पा. नं. १

## हेरॉइन जप्त; एकास अटक

**वसई :** नालासोपारा पूर्वेस अंमली पदार्थांसह एका व्यक्तीला अटक करण्यात गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांना यश आले आहे. त्याच्याकडून ५५ लाख किमतीचे ५१० ग्रॅम वजनाचे हेरॉइन जप्त करण्यात आले आहे. संजय विश्वकर्मा (२८) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

म. टा. पु. पा. नं. १

## जाधव यांची नियुक्ती

**मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदर महापालिकेच्या मुख्य लेखाधिकारी पदी राज्य सरकारकडून कालिदास जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मागील दीड वर्षांपासून या पदाची अतिरिक्त जबाबदारी लेखाधिकाऱ्याकडे होती. जाधव हे सहाय्यक संचालक श्रेणीत असताना त्यांची उपसंचालकपदी तात्पुरत्या स्वरूपात बढती करण्यात आली आहे. यासह मिरा-भाईंदर महापालिकेचे मुख्य लेखाधिकारी पद हे सहसंचालक वर्गातील असताना, ते उपसंचालक पदाच्या, म्हणजेच खालच्या संवर्गात आणण्यात आले आहे.

सकाळ पु. पा. नं. २

# मिरा-भाईंदरमध्ये रंगणार कला महोत्सव

भाईंदर, ता. १ (बातमीदार) : मिरा भाईंदरमध्ये डिसेंबर महिन्यात दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रताप सरनाईक फाऊंडेशन व संस्कृती युवा प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून ९ ते १२ डिसेंबरदरम्यान या आर्ट फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसिद्ध गायक शंकर महादेवन, कवी कुमार विश्वास हे या महोत्सवाचे आकर्षण असणार आहे, अशी माहिती आमदार प्रताप सरनाईक यांनी दिली.

शहरातील नागरिकांची सांस्कृतिक गरज पूर्ण करण्यासाठी आमदार प्रताप सरनाईक यांनी पाच वर्षांपूर्वी मिरा-भाईंदर आर्ट फेस्टिव्हलची सुरुवात केली. कोरोना काळात त्यात खंड पडला होता. भाईंदर पूर्व येथील स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे मैदान या ठिकाणी हा महोत्सव साजरा केला जाणार आहे. चित्र प्रदर्शन, विविध कला प्रदर्शन, रांगोळी प्रदर्शन, हस्तकला वस्तूंचे प्रदर्शन असणार आहे. देश-विदेशातील प्रसिद्ध चित्रकारांची जुनी चित्रे या प्रदर्शनात पाहता येणार असून चित्र प्रदर्शनाचे एक मोठे दालन असेल. तसेच लहान मुलांसाठी 'गेम झोन', खाद्यप्रेमींसाठी फूड स्टॉल असणार आहेत. कल्चरल ॲक्टिव्हिटी, फन फेयर, सेल्फी पॉईंटसह अनेक आकर्षक कला-संस्कृतीशी निगडित गोष्टी या महोत्सवात पाहायला मिळतील. तसेच मूर्तिकलेचाही सर्वांना परिचय व्हावा म्हणून मूर्तिकार स्वतः येऊन मूर्ती कलेचे प्रदर्शन घडवणार आहेत. महोत्सवाला दररोज ६० ते ७० हजार नागरिक भेट देतील अशी अपेक्षा आहे. हा महोत्सव मोफत असणार आहे, अशी माहिती सरनाईक यांनी दिली.


CamScanner

सकाळ पु. पा. नं. २

# आंदोलनाचा इशारा देताच रस्त्याचे काम

भाईंदर, ता. १ (बातमीदार) : अनेक वेळा तक्रार करूनही सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामासह अन्य समस्यांकडे महापालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने मिरा रोडमधील रहिवाशांनी साखळी उपोषण आंदोलन करण्याचा इशारा दिला. परिणामी खडबडून जागे झालेल्या महापालिका प्रशासनाने रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्यासह अन्य समस्याही सोडवण्याचे आश्वासन रहिवाशांना दिले आहे.

मिरा रोडमधील कनाकिया भागातील रस्ते सिमेंट काँक्रीटचे करण्याचे काम सुरू आहे. खासगी विकसकाला टीडीआर देऊन हे रस्ते त्याच्याकडून बांधून घेण्यात येत आहेत, पण 'जांगीड एन्क्लेव्ह' ते 'मेरी गोल्ड' यादरम्यानच्या रस्त्याचे काम विकसकाने अर्धवटच सोडले आहे. त्याचा रहिवाशांना मोठा त्रास होत आहे. रस्ता अर्धवट असल्याने मोठ्या प्रमाणात धूळ उडते, शिवाय अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. यासंदर्भात भाजपचे माजी नगरसेवक संजय थेराडे यांनी येथील रहिवाशांच्या वतीने महापालिकेकडे वारंवार लेखी तक्रारी केल्या, पण कोणतीही कार्यवाही झाली नाही. याव्यतिरिक्त याच भागात पोस्ट आणि टेलिग्राफ कार्यालयासाठी आरक्षित जागा अनेक वर्षे पडीक अवस्थेत आहे. त्यात मोठ्या प्रमाणावर महापालिकेचे सामान, कचरा व घाण साचून राहिल्याने त्याचा त्रास रहिवाशांना सोसावा लागत आहे. याशिवाय या भागातील क्रिकेट टर्फ मैदान उशिरापर्यंत सुरू असणे, भूमिगत गटार योजनेची मलवाहिनी स्वच्छ नसणे आदी तक्रारी रहिवाशांनी केल्या होत्या. प्रशासनाकडून या तक्रारींची दखल घेण्यात येत नसल्याने अखेर येथील रहिवाशांनी १ डिसेंबरपासून साखळी उपोषण करण्याचा निर्णय घेतला. तशी माहिती महापालिका प्रशासनाला देण्यात आली.



भाईंदर : मिरा रोड येथील अर्धवट काम झालेला रस्ता.

## आंदोलनाचा निर्णय मागे

आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर जागे झालेल्या प्रशासनाने रहिवाशांच्या शिष्टमंडळाची तातडीने बैठक बोलावली. या बैठकीत रस्त्याचे अर्धवट राहिलेले काम येत्या सात दिवसांत सुरू करण्यात येईल, टर्फ क्रिकेटची वेळ रात्री १० पर्यंत मर्यादित करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले; तर आरक्षणाच्या जागेची साफसफाई व मलवाहिन्यांची स्वच्छता प्रशासनाने तात्काळ सुरू केली. त्यामुळे आंदोलनाचा निर्णय मागे घेण्यात आला आहे, अशी माहिती संजय थेराडे यांनी दिली.

लोकसत्ता पु. पा. नं. १

# रात्रीच्या वेळी रिक्षाचालकांची अरेरावी

लोकसत्ता प्रतिनिधी

विरार : वसई, विरार शहरात रात्रीच्या वेळी रिक्षाचालकांचा वेगळा चेहरा समोर येत आहे. दिवसा प्रवाशांच्या मर्जीने चालणारे रिक्षावाले रात्री जणू काही गुंडांसारखे वागत आहेत. रात्री रिक्षाचालक दादागिरीने वागत असल्याने प्रवासी हैराण झाले आहेत. यामुळे पोलिसांनी रात्रीच्या वेळी गस्त वाढवून या रिक्षाचालकांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

सध्या वसई, विरारमध्ये भाडेवाढीमुळे रिक्षाचालक आणि प्रवासी यांच्यात तणाव वाढत चालला आहे. यामुळे रिक्षाचालक आणि प्रवासी यांचे सातत्याने खटके उडत आहेत. पण दिवसाच्या प्रकाशात अनेक वेळा नमते घेणारे रिक्षाचालक रात्रीच्या वेळी मात्र उग्र होतात. विरार पूर्वेला रेल्वे स्थानकाच्या परिसरात वाहतूक पोलीस कर्मचारी गेल्यानंतर रिक्षाचालक रस्ता आपल्या खासगी मालकीचा असल्यासारखे वागत आहे. रस्त्यात वाट्टेल तिथे रिक्षा उभ्या करून प्रवासी भरणे, उतरवणे, इतर वाहनांचे मार्ग अडविणे, प्रवाशांना बळजबरीने आपल्याच रिक्षात बसविणे असे प्रकार सुरू आहेत. या ठिकाणी रिक्षाचालक रात्रीच्या वेळी तीन, चार रांगा लावत रस्ता काबीज करून टाकतात. यामुळे इतर वाहनांना जाण्यासाठी मार्ग मिळत नाहीत. त्यात रिक्षावाल्यांना विचारणा केली असता अंगावर धावून जातात. तर दुसरीकडे अनेक बेकायदा रिक्षांचा रात्रीच्या वेळी मोठा भरणा होतो. यातील अनेक रिक्षांवरील चालक हे नशापान करून असतात. त्यांच्याकडे कोणतेही परवाने नसतात. भरधाव वेगाने रिक्षा नेत असल्यामुळे प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. त्यात अनेक रिक्षावाले आपल्या रिक्षात, लोखंडी, लाकडी दांडे, पाइप ठेवत असल्याची माहिती काही प्रवाशांनी दिली आहे.

> "रात्रीच्या वेळी रिक्षावाले मुजोरीने वागतात, खासगी रिक्षाचे रात्री दुपटीने दर आकारतात. प्रवाशांची आर्थिक लूट चालवली आहे. रात्रीच्या वेळी बहुतांश रिक्षाचालक हे गणवेशात नसतात, पण वाहतुकीची साधने नसल्याने प्रवाशांचा नाइलाज होत आहे. - **प्रकाश लोंढे**, प्रवासी

> "रिक्षाचालक रात्रीच्या वेळी चार-पाच रांगा लावून सर्व रस्ता काबीज करून ठेवतात, यामुळे इतर वाहनांना जाण्यासाठी जागा मिळत नाही. यामुळे अनेक वेळा इतर वाहनधारकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. - **विजय पाटील**, प्रवासी

CamScanner

लोकसत्ता पु. पा. नं. १



# गुजरात राज्यातील निवडणुकीसाठी मुंबईतून मद्य

## लक्झरी बसमधून तस्करी, ५ जणांना अटक

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**वसई** : गुजरात राज्यातील निवडणुकीसाठी मुंबईतून होणारी मद्यतस्करी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने उघडकीस आणली आहे. मुंबईहून गुजरातला जाणाऱ्या आरामदायी प्रवासी बसमधून ही तस्करी केली जात होती. याप्रकरणी भरारी पथकाने ५ जणांना अटक केली असून बनावट मद्याचा मोठा साठा जप्त केला आहे.

सध्या गुजरात राज्यात विधानसभा निवडणुका सुरू झाल्या आहेत. त्यासाठी मुंबईवरून मद्य चोरट्या मार्गाने नेले जात असल्याची माहिती पालघरच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळाली होती. त्यानुसार गुरूवारी पथकाने महामार्गावरील काशिद कोपर गावाजवळ वेस्टर्न हॉटेल समोर सापळा लावला होता. यावेळी टाटा एस कंपनीचा टेंम्पो (एमएच ४८ बीएस ३०६५) मधून ३ इसम सिफात टूर्स अॅण्ड ट्रॅव्हल्स या स्लीपरी लक्झरी बस मध्ये (जीजे ८ एयू ५०५२) मद्य लपवलत असलेले आढळले. पथकाने केलेल्या कारवाईत २४ खोके जप्त करण्यात आले. त्यात २१६ विदेश मद्याच्या बाटल्या होत्या. मद्याची लेबल बदलण्यात आली होती.

याप्रकरणी टेम्पोचालक दिलीप मिश्रा (४०) मद्यसाठा पुरवणारा प्रदीप पिल्ले (४१) बस चालक अब्दुल सलाम नेदरिया (४३) तसेच सचिन मिश्रा (४१) आणि यासिफ खान बिहारी यांना अटक करण्यात आली. ट्रान्सपोर्ट बसचा मालक ताहिर पलसानिया हा फरार आहे. या कारवाईत मद्यसाठा आणि वाहने मिळून एकूण ३९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींवर महाराष्ट्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी दोन आरोपी फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

CamScanner